| Newspaper | Page No. | Date |
|---|---|---|
| Prabhat | | 15-07-2014 |

# अंध विद्यार्थ्यांनी अनुभवला चित्रपट; 'एस्सार'चा उपक्रम

पुणे, दि. १४ (प्रतिनिधी) - अंध लोकांना दिसत नसले, तरी त्यांना ऐकता येते. त्यामुळे ते चित्रपट पाहू शकत नसले तरी ऐकून आनंद घेऊ शकतात. अशा विद्यार्थ्यांनी आज अभिनेता अमीर खानचा 'थ्री इडियट' या चित्रपटाचा अनुभव लुटला. 'उन्मुक्त' या उपक्रमांतर्गत अंध मुलांना हा चित्रपटाचा अनुभव घेता आला.

एस्सार ग्रुप फाउंडेशन या संस्थेने अंध विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम केला. विशेष ध्वनिवर्णित (कॉमेंट्री) चित्रपटाचे प्रदर्शन कोरेगाव पार्क येथील अंध मुलांच्या शाळेत ठेवले होते. पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी त्याची मौज लुटली. या ध्वनिवर्णित तंत्रामध्ये चित्रपटातील जी दृश्ये अंधांना समजणार नाहीत, अशा ठिकाणी अतिरिक्त आवाजाद्वारे वर्णन केले जाते. त्यामुळे अंधजन इतरांची मदत न घेता चित्रपटाचा आनंद घेऊ शकतात. अशाप्रकारे ध्वनिवर्णित संपादन करून चित्रपट दाखविणारी 'एस्सार' ही देशातील पहिली कंपनी असून, राज्यात अशा प्रकारचा प्रयोग प्रथमच झाला आहे. दरम्यान, या कार्यक्रमात अंध मुलांसोबत डोळस व्यक्तींच्या डोळ्यावर पट्टी बांधून या विशेष ध्वनिवर्णित चित्रपटाचा अनुभव देण्यात आला. जेणेकरून त्यांना अंधांच्या (पान ३ पहा) ▸▸

पान १ वरून

## अंध विद्यार्थ्यांनी अनुभवला चित्रपट...

समस्यांची जाणिव होईल. आदेश भालेराव याने श्रोत्यांवरचा परिणाम आजमावला. 'एस्सार' कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मितेश शहा, मनुष्यबळ विकास विभागाचे प्रमुख मुकुंद जहागीरदार, सीएसआर व्यवस्थापक रवींद्र वाघमारे यांनी मुलांना प्रश्न विचारले. 'चित्रपट कसा होता?' या प्रश्नावर सामूहिकपणे 'मस्त' असे उत्तर आले. पुन्हा याच पद्धतीने कोणता चित्रपट पाहणार? या प्रश्नावर लहान मुलांनी 'तारे जमी पर' अशी फर्माईश केली.